CNR NO.MHRT05-000-060-201.

**म. कौ. हि. सं. अर्ज क्र.३/२०२१**

**सौ.आरती अजित आंब्रे** अर्जदार

विरुध्द

**श्री.अजित विश्वास आंब्रे** सामनेवाला

**नि.६ व ८ वरील आदेश**

१. अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल करुन कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा २००५ मधील तरतुदीस अनुसरुन अंतरीम आदेशांची विनंती केली आहे.

२. अर्जदाराचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–

अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह दि.११/५/२००३ रोजी मौजे चिरणी, ता. खेड, जि. रत्नागिरी येथे झाला. सुरुवातीला दिवस आनंदाचे गेले. अर्जदार सासरी सकाळी साडे सहाला उठुन विहीरीवरचे पाणी भरणे, नदीवर जाऊन कपडे धुणे अशी सर्व कामे करायची. सामनेवाला डोक्याने गरम असल्याने तो शुल्लक कारणावरुन भांडायचा, तिला धाकात ठेवायचा, तिने ऐकले नाही तर तमाशा करायचा. लग्नानंतर दिड महिन्यात तिला दिवस गेल्यानंतर सामनेवाला याच्या बहिणीची मुलगी अर्जदार हिने त्याने सांगितल्या सांगितल्या घेतली नाही म्हणुन त्याने तिला शिव्या दिल्या, मारहाण केली, तरी सामनेवाला याचा सर्व त्रास सहन करुन तिथे ती राहत होती. दि.२८/०२/२००४ रोजी तिला मुलगी आदिती झाली. तिच्या जन्मानंतर २१ दिवसानंतर ती सासरी आली. त्यावेळी नणंदेने

गैरसमजुती मुळे सामनेवाल्याकडे तिच्याविषयी तक्रार केली. सासु सासऱ्यांनी तिला त्यादिवशी उपाशी ठेवले. दुसऱ्या दिवशी सामनेवाला मुंबईहुन परत आल्यानंतर तिला मारहाण केली. दि.१८/९/२००९ रोजी तिला मुलगा निरज झाला. सामनेवाला याने तिला गरोदरपणातही प्रचंड शारीरिक व मानसिक त्रास दिला, मारहाण केली, तिची काळजी घेतली नाही. तिला घरातील कामे करायला लावयाचा. निरजच्या जन्मानंतर २० दिवसांनी अर्जदार हिने जेवण चांगले केले नाही म्हणुन सामनेवाला याने तिला मारहाण केली. त्यामुळे ती आजारी पडली, तिला घरातील कामे करणे शक्य होईना. सामनेवाला याने तिला घरातुन बाहेर काढले. अर्जदार हिने आईला बोलावुन घेतले व आई तिला माहेरी घेवुन गेली. अर्जदाराला बरी होण्यासाठी दोन महिने लागले. त्यानंतर ती सासरी आली. त्यावेळी दिराने एकत्र न राहण्याचे सांगितले. त्यावेळी सासुने त्यांना वेगळे राहण्यास सांगितले. त्यामुळे सामनेवाला तिला लोटे येथे घेवुन आला. परंतु त्यास अर्जदार ही जबाबदार आहे असे समजुन सामनेवाला याने तिला शिवीगाळी केली. दरम्यान अर्जदाराचे सासरे आजारी पडल्याने ते तिच्याकडे येवुन राहिले. अर्जदार हिची इच्छा नसतानाही सामनेवाला यांच्या म्हणण्याखातर ती सरपंच झाली, पंचायत समितीत सदस्यत्व केले. त्यानंतर तिने राजकारण करण्यास नकार दिला याचा राग सामनेवाला याला आला.

३. सामनेवाला याच्या सतत शिवीगाळी व मारहाणीमुळे अर्जदाराचे डोके दुखु लागले. तिच्या भावाने पुढाकार घेवुन लिलावती हॉस्पीटल, मुंबई येथे उपचारासाठी नेले. डॉक्टरांनी तिला विचार कमी करण्याच्या गोळया दिल्या व अति विचारामुळे डोक्यावर परिणाम होवु शकतो असे सांगितले. सन २०१५ मध्ये अर्जदाराच्या गोळया संपल्यावरही

सामनेवाला याने त्या आणल्या नाहीत त्यामुळे तिच्या शरीरावर विपरीत परिणाम झाला. तिने गोळयाची मागणी केली असता तिला मारहाण व शिवीगाळी केली. सन २०१८ मध्ये सामनेवाला याने डंपर घेतला असल्याने तो रात्र रात्र बाहेर असायचा व घरी येत नसे त्यावेळी घराची संपुर्ण जबाबदारी अर्जदार सांभाळायची. मार्च २०२० मध्ये मुलाचे मौजे सापडत नाहीत या कारणावरुन सामनेवाला याने तिला शिवीगाळी केली, मारहाण केली, तु मेंटल आहेस असे म्हणाला. त्यामुळे ती मनाने खचली. अती नैराश्याने तिने पायाखाली स्टुल घेतला व वेळीच आत्महत्येचा विचार मागे सारला. त्याचा राग येवुन सामनेवाला याने तिची परिस्थिती न समजुन घेता तिला हाताला धरुन घराबाहेर ढकलले व तेव्हापासुन ती नाईलाजाने माहेरी राहत आहे.

४. अर्जदाराचे पुढे कथन की, तिला सामनेवाला सोबत नांदावयाचे आहे. घटस्फोट घेण्याचे कोणतेही कारण नाही. सामनेवाला याने त्याचे कोणतेही कर्तव्य पार पाडलेले नाही. त्यामुळे अर्जदार आजारी पडली. त्याने जाणुनबुजुन तिला नांदविले नाही. त्याने मुलांवरही दडपण आणले आहे. त्याने मे.दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, खेड यांचे न्यायालयात विवाह अर्ज क्र.१०५/२०२० दाखल करुन घटस्फोटाची मागणी करुन अर्जदाराला मानसिक त्रास दिलेला आहे.

५. अर्जदाराचे पुढे कथन की, सामनेवाला यांचे दोन डंपर आहेत,दोन एकर शेती आहे. एक वडीलार्जित व एक स्वतःचे अशी दोन घरे आहेत. त्यापासुन त्याला दरमहा दोन लाख उत्पन्न मिळते. मुलांची सोडुन सामनेवाला याचेवर इतर कोणाचीही जबाबदार नाही. सामनेवाला याने कोणत्याही संयुक्तीक कारणाशिवाय अर्जदाराचा त्याग केला असल्याने तिला

अंतरीम संरक्षण आदेश, दरमहा रुपये पन्नास हजार पोटगी, चिरणी येथील घरात राहण्याचा आदेश, व रहिवास आदेशाकरीता दरमहा रुपये पंधरा हजार सामनेवाला याने अर्जदार हिला दयावेत असा आदेश करावा, तसेच सामनेवाला यांच्या ताब्यात असलेले अर्जदाराचे कपडे, वस्तु, दागिने तिला परत देण्याचा अंतरीम आदेश व्हावा. अर्जदार हिने नि.८ येथे अर्ज दाखल करुन तिचे तिच्या कुटुंबावर अत्यंत प्रेम असल्याने तिला व पती व मुलां समवेत एकत्रात राहणेस मिळावे म्हणुन चिरणी येथील घरात रहाण्यास देणेबाबत अंतरीम आदेशाचीही मागणी केली आहे.

६. सामनेवाला याने नि.१३ येथे म्हणणे देवुन अर्ज नि.६ कलम १ ते २२ मधील संपुर्ण मजकुर व नि.८ चा संपूर्ण अर्ज स्पष्टपणे नाकारुन आव्हानीत केलेला आहे. सामनेवाला नोकरीस होता, त्यास तीन हजार रुपये दरमहा मेहनताना मिळत होता, ती नोकरी गेली, सामनेवाला व त्याची भावंडे वेगळी राहतात, तो शेतीवर सर्वाचे संगोपन करतो व कमी उत्पन्न असल्यामुळे बांधकाम व्यावसायिक यांचेकडे कामाला जातो, दोन मुलांच्या शिक्षणाचा तो खर्च करतो, घटस्फोटाचा अर्ज दाखल केल्यामुळे चिडुन जावुन अर्जदाराने हा अर्ज केला आहे, उत्पन्नाबाबतची कथने चुकीची आहेत, अर्जदार स्वेच्छेने स्वतःचे दागिने घेवुन गेली आहे त्यामुळे तिला सदरच्या मागण्या करता येणार नाहीत, अर्ज नामंजुर करावा असा बचाव सामनेवाला याने घेतला आहे.

७. सामनेवाल्याचे पुढे कथन की, त्याचे एकत्र कुटुंब होते. लग्नानंतर अर्जदार सासरी आली. माहेरी ती अत्यंत लाडात वाढलेली होती. सासरी आल्यानंतर ती काम करण्यास टाळाटाळ करीत असे व भांडण करीत असे. सकाळी लवकर उठण्यास तिची

नाराजी असे. त्यानंतर तिला दिवस गेल्यानंतर ती वारंवार माहेरी जावु लागली. ती विचित्र वागत राहिली. अर्जदाराच्या गरोदरपणात सामनेवाला याने तिचा विचित्र त्रास सहन केला. मुलगी आदितीच्या जन्मानंतर तिने सामनेवाल्याकडे नांदण्यास येण्यास नकार दिला. सामनेवाला याने याबाबत तिला विचारले असता तिला मुंबईवाला नवरा हवा होता, तिच्या मनाविरुध्द लग्न झाले असे सांगितले. त्यानंतर बैठक झाली व सगळयांच्या सांगण्यानुसार ती सासरी आली. सुरुवातीचे काही महिने नीट गेल्यानंतर परत ती तसेच वागु लागली. आदितीचे पालनपोषण सामनेवाल्याच्या आईने केले. ती नऊ महिन्यांची असताना अर्जदार तिच्या माहेरी निघुन गेली व दोन महिन्यापेक्षा जास्त काळ तिथे राहिली. नंतर दोन तीन महिने सासरी येवुन राहिली. तिच्या चांगल्या वागणुकीसाठी सामनेवाला यांनी बरेच प्रयत्न केले. अर्जदार हिचे चांगले वागणे होईपर्यन्त सामनेवाला यांना दुसरे मुल नको होते. याचा राग मनात धरुन तिने सामनेवाला यांना वैवाहिक सौख्यापासुन वंचित ठेवले. त्याच्याशी न बोलणे, वेळेवर जेवण न देणे, घालुन पाडुन बोलणे, सासु सासऱ्यांचा अनादर करणे अशा गोष्टी ती करु लागली. दुसऱ्या मुलाच्या जन्मानंतर माहेरी जाण्यासाठी तिने हट्ट केला. सामनेवाला तिला स्वंतत्र वाहनाने माहेरी सोडुन आले. दरम्यानच्या काळात सामनेवाला याचा लहान भाऊ रंजित याचा विवाह झाला. त्यानंतर अर्जदार हिने जास्तच त्रास देण्यास सुरुवात केली. त्यामुळे आईवडीलांच्या सल्ल्याने ते वेगळे राहु लागले. सामनेवाला याने स्वतंत्र घर बांधले. सामाजिक व राजकीय कार्यात भाग घेतल्याने अर्जदार हिच्या वागणुकीत फरक पडेल असे वाटल्याने सामनेवाला याने तिला सरपंच व पंचायतीत सदस्य होण्याची संधी दिली. सन २०१३ मध्ये अर्जदाराचा मानसिक आजार बळावला. तिचे घरकामात लक्ष नसे, विक्षिप्त वागत असे, त्यावेळी तिच्या भावाने तिला मुंबई येथील इस्पीतळात दाखविले,

तिला मेंदुचा आजार झाल्याचे समजले. त्यानंतर तिचे वर्षभर उपचार चालु होते. त्यावेळी प्रत्येक वेळी सामनेवाला तिला घेवुन मुंबई येथे पोहोचत असे. तिच्यावर मनोचिकित्सक सल्लागार यांचेकडे उपचार सुरु होते. तिची मानसिक स्थिती हळुहळु बिघडायला लागली. सन २०१५ मध्ये तिने स्वतःच्या अंगावर रॉकेल ओतुन पेटविण्याचा प्रयत्न केला. सामनेवाला व तिच्या दोन्ही मुलांनी तिला वेळीच परावृत्त केले. अर्जदाराची देखभाल करण्यास सामनेवाला याचे आईवडील तयार होते परंतु तिला सासरचे लोक नको होती. मात्र तिची आई तेथे येवुन राहत होती. सन २०१५ मध्ये एके दिवशी अर्जदार हिने स्वतःच्या अंगावर पाणी ओतुन घेवुन घराबाहेर विवस्त्र बाहेर जाण्याचा प्रयत्न केला व सामनेवाला याला तुझ्या घराची इज्जत घालवते असे सांगितले. परंतु सामनेवाला याने प्रसंगावधान राखुन तिला आवरले. सदरची बाब सामनेवाला याने तिच्या भावाला सांगितली. अर्जदाराच्या मानसिक आजारपणामुळे कुटुंबाचे पालनपोषण सामनेवालाच करीत होता. शेतात अंगमेहनतीने उगवलेली भेंडी अर्जदार हिने अंगणात फेकुन दिली. ती स्वतः पुरते जेवण करुन जेवत असे. मार्च २०२० मध्ये मुंबईला जायचे असा हट्ट करुन तिने सामनेवाला याच्या कानाखाली मारली. दि.२५/३/२०२० रोजी सकाळी १०.०० च्या सुमारास अर्जदार हिने बेडरुम मधील बेडवर प्लॅस्टीकचा स्टुल ठेवुन पंख्याला ओढणी बांधुन जीव देण्याचा प्रयत्न केला. सदरची बाब सामनेवाला याने तिच्या भावाला कळविली. जमलेल्या लोकांनी तिला समजावले व भावाच्या सांगीवरुन तिला शिवतर येथे नेण्याचे ठरविले. लॉकडाऊन असल्यामुळे रंजित याने तिला दुचाकीवरुन शिवतर येथे सोडले. ती तिच्या मर्जीनेच शिवतर येथे राहते. लॉकडाऊनच्या काळात तिने घरी येण्यास नकार दिला. तिने तिच्या कर्तव्याचे पालन केले नाही. सामनेवाला याच्या मानसिकतेचे खच्चीकरणे केले. सामनेवाला याने पाठविलेली

नोटीस घेतली नाही. दि.८/११/२०२० च्या बैठकीत तिला नांदायचे नाही असे तिने सांगितले. तिने सन २००४ पासुन सामनेवाला यांना सतत मानसिक व शारीरिक त्रास दिला आहे. त्यामुळे सामनेवाला यानी अर्ज केला होता. दि.२५/३/२०२० पासुन दोघेही विभक्त राहत आहे. त्यामुळे अर्ज दाखल करण्यास कारण घडलेले नाही. अर्जातील विनंत्या फेटाळण्यास पात्र आहे त्यामुळे अर्ज नामंजुर करावा असे सामनेवाल्याचे म्हणणे आहे.

८. मी प्रकरणाचे अवलोकन केले. अर्जदार व सामनेवाला यांच्यातर्फे विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या कथनांच्या अनुषंगाने युक्तीवाद केला. त्यामुळे तो येथे परत सविस्तर नोंदविण्यात आलेला नाही. अर्जदाराच्या युक्तीवादाप्रमाणे सामनेवाला याने तिचा त्याग केला आहे. तिचा शारीरिक व मानसिक छळ केला आहे. उत्पन्नाचे साधन असुनही तिच्यावर उपचार केला नाही व तिची नांदायची इच्छा असुनही घटस्फोटाचा अर्ज दाखल केला. सामनेवाल्याच्या युक्तीवादानुसार सामनेवाला याने त्यांचे वैवाहिक संबंध व नातेसंबंध निभवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. अर्जदार हिला लग्नापुर्वीपासुन मेंदुशी निगडीत आजार आहे. ती विक्षिप्त वागते. तिच्यावरील उपचारासाठी सामनेवाला याने यथोचित सर्व ते प्रयत्न केले. परंतु तिच्या विक्षिप्त वागण्यामुळे सामनेवाला व त्याच्या मुलाचे आत्यंतिक हाल झाले. अर्जदार तिच्या इच्छेने माहेरी राहते. त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा.

९. या अर्जाच्या निर्णयासाठी खालील प्रश्न उपस्थित होतात. त्यावरील माझे निष्कर्ष व त्याची कारणे नमुद केली आहेत ती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार मागणीप्रमाणे संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी. |
| २. | अर्जदार मागणीप्रमाणे अंतरिम पोटगी व निवास आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | अशंतः होकरार्थी. |
| ३. | अर्जदार चिरणी येथील घरात तिचे पती व मुलांसोबत रहाण्यासाठी मागणी प्रमाणे अंतरिम रहिवास आदेश मिळणे पात्र आहे काय ? | नकारार्थी. |
| ४. | अर्जदार मागणी प्रमाणे अंतरिम आदेशाद्वारे दागिने व वस्तु परत मिळण्यास पात्र आहे काय ? | नकारार्थी. |
| ५. | आदेश काय ? | अर्ज अशंतः मंजुर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

**प्रश्न क्र १ करीताः–**

१०. अर्जदार व सामनेवाला यांच्यातील वैवाहिक संबंध आव्हानीत झालेले नाहीत. सामनेवाला यांनी अर्जदार विरुध्द घटस्फोटाचा अर्ज दाखल केल्याचे स्पष्ट आहे.

११. अर्जदार हिने सामनेवाला याने तिच्यावरती शारीरिक व मानसिक हिंसाचार केला, शिवीगाळी केली अशी कथने केली आहेत त्यास तिच्या शपथपत्राने पृष्टी मिळते. समानेवाला याने सदरच्या बाबीं म्हणणे देवुन नाकारल्या आहेत. अर्जदार विक्षिप्त वागते, तिला मानसिक आजार आहे, तिने दोनदा जीव देण्याचा प्रयत्न केला, ती कोणत्याही कारणा शिवाय माहेर निघुन गेली आहे, तिच्या विक्षिप्त वागण्यामुळे तिच्या दोन मुलांवरती विपरीत

परिणाम होवु लागला आहे, तसेच समाजामध्येही सामनेवाला यास नामुष्की आली आहे, त्यामुळे अर्जदार हिचा अर्ज फेटाळावा असा युक्तीवद केला आहे.

१२. अर्जदार व सामनेवाला यांनी एकमेकांवर आरोप केले असले तरी सदर आरोपांची सत्यता पुराव्याअंती ठरणार असल्याने व सध्या दोघांच्या कथनांप्रमाणे अर्जदार तिच्या माहेरी राहत असल्याने व अर्जदार हिच्या कथनांना तिच्या प्रतिज्ञापत्रामुळे पृष्टी प्राप्त झाल्याने अंतरीम संरक्षण आदेश पारीत करणे न्यायोचित ठरेल या निष्कर्षाप्रत मी आले आहे म्हणुन मी प्रश्न क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>प्रश्न क्र. २ करीताः–</u>**

१३. अर्जदाराचे कथन की, सामनेवाला यास दरमहा दोन लाख उत्पन्न आहे व त्याने तिच्या चरितार्थाची कोणतीही सोय केली नाही. तसेच तिच्या वैदयकिय उपचाराची सोय केली नाही. सामनेवाल्याचे कथन की, ती स्वःइच्छेने माहेरी गेली आहे. सामनेवाला याने तिच्या उपचाराचा सर्व तो खर्च केला आहे. सामनेवाला यास अर्जदार म्हणवते त्याप्रमाणे उत्पन्नाचा स्त्रोत नाही. तो शेती व बांधकाम निगडीत कामे करुन कसेबसे कुटुंबाचा खर्च भागवितो. त्यामुळे अर्जदाराचे अर्जातील पोटगी बाबतची मागणी फेटाळण्यास पात्र आहे.

१४. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे सामनेवाल्याच्या उत्पन्नाबाबतचा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. मार्च २०२० पासुन अर्जदार तिच्या माहेरीच राहते. मार्च २०२० पासुन अर्जदाराच्या चरितार्थासाठी सामनेवाला याने काय मदत केली याबाबतचा खुलासा सामनेवाला याने अभिलेखावर केलेला नाही. त्यांचे वैवाहिक नातेसंबंध अस्तित्वात असताना पती म्हणुन पत्नीला सांभाळण्याची जबाबदारी सामनेवाल्याची आहे. युक्तीवादा दरम्यान

सामनेवाल्या तर्फे तो पती म्हणुन जबाबदारी नाकारत नाही, त्याच्या कमाईतुन फुल ना फुलाची पाकळी तो अर्जदाराच्या उपचारासाठी देण्यास तयार आहे असे समोर आले आहे. अर्जदारावरती वैदयकीय उपचार चालु आहेत ही बाब ही त्याने नाकारलेली नाही. त्यामुळे अभिलेखावरील अर्जदार व सामनेवाला यांची कौटुंबिक परिस्थिती व समानेवाला याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता सामनेवाला यांनी अर्जदार यांना अर्ज दाखल तारखेपासुन दरमहा अंतरिम पोटगी म्हणुन अन्न वस्त्र, निवारा व वैदयकिय खर्चासाठी असा एकत्रीत रक्कम रुपये पाच हजार प्रतीमहा अंतरिम पोटगी देण्याबाबत आदेश पारीत केल्यास तो न्यायोचित ठरेल या निष्कर्षाप्रत मी आले आहे. म्हणुन मी प्रश्न क्र. २ चे उत्तर अशंतः होकारार्थी देत आहे.

**<u>प्रश्न क्र.३ करीताः–</u>**

१५. अर्जदार हिने प्रसतुत अर्जाद्वारे सामनेवाला राहत असलेल्या चिरणी येथील घरात राहण्याबाबत निवास आदेश मिळावा अशी मागणी केली असली तरी या अर्जात दाखल असलेल्या कथनावरुन तसा आदेश करणे प्राप्त परिस्थितीत उचित ठरणार नाही त्यामुळे अर्जदाराची सदरची मागणी अंतरिमरित्या नामंजुर होण्यास पात्र आहे या निष्कर्षाप्रत मी आले आहे. म्हणुन मी प्रश्न क्र. ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>प्रश्न क्र.४ करीताः–</u>**

१६. अर्जदार हिने सामनेवाला यांच्याकडे तिचे असणारे दागिने, कपडे, वस्तु त्याने परत दयावेत अशा अंतिम आदेशाची मागणी केली आहे. सामनेवाला यांनी सदरची बाब ही नाकारली आहे. त्यामुळे ही बाब पुराव्याअंती ठरणार असल्याने अजर्दार हिची सदरची

मागणी अंतरीमरित्या फेटाळण्यास पात्र आहे. म्हणुन प्रश्न क्र.४ चे उत्तर नकारार्थी देत आहे व प्रश्न क्र. ५ च्या उत्तरादाखल खालीप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अशंतः मंजुर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला यांनी अर्जदार यांना कोणत्याही प्रकारे कौटुंबिक हिंसाचाराच्या व्याख्येत समाविष्ट होईल असा हिंसाचार करु नये असा संरक्षण आदेश पारीत करण्यात येत आहे.

३. हा अर्ज दाखल तारखेपासुन सामनेवाला याने अर्जदार यांना दरमहा रक्कम रु.५,०००/-(रुपये पाच हजार मात्र) अन्न, वस्त्र, निवारा व औषधोपचार यासाठी अंतरिम पोटगी म्हणुन दयावयाची आहे.

४. सदर आदेशाची प्रत पक्षकारांना विनामुल्य देण्यात यावी.

५. सदर आदेशाची एक प्रत संबंधीत ठाणे अंमलदार व संरक्षण अधिकारी यांना माहितीस्तव देण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात पारीत व घोषित केला.)

PRATIBHA SUDHIR JADHAV
Digitally signed by PRATIBHA SUDHIR JADHAV
Date: 2021.12.10 17:22:34 +0530

ठिकाणः-खेड.
दिनांकः-०९/१२/२०२१.

श्रीमती पी.एस.जाधव,
न्यायदंडाधिकारी वर्ग-१, खेड,
ता. खेड, जि. रत्नागिरी.

The contents of PDF file of order / Judgments are as per the original file.

Name of the Court :-Jt. Civil Judge, J.D., Khed, Tal. Khed, Dist.Ratnagiri.
Name of Stenographer :- Smt. Neha Shekhar Desai
Name of the P.O. :- Sou.P.S.Jadhav.
Date of Pronouncement :- 09.12.2021
Order signed on :- 10.12.2021
Order uploaded on :-10.12.2021